REVIEW OF RESEARCH

ISSN: 2249-894X
IMPACT FACTOR : 3.8014(UIF)
VOLUME - 6 | ISSUE - 4 | JANUARY – 2017

# पर्यावरणीय प्रश्न - एक जागतिक समस्या



**डॉ. मारूती घंटेवाड**
**वसुंधरा कला महाविदयालय, जुळे सोलापूर.**

## प्रस्तावना

पृथ्वीतलावर मानव जातीचा विकास होत होता. तसा मनुष्याने आपल्या प्रगतीसाठी विभिनन प्रकारचे शोध लावण्यात मग्न झाला. तेव्हाच त्याच्या व्यक्तिगत स्वार्थ जागा झाला. तो स्वतःच्या हिता कडे अधिक लक्ष देण्यात मग्न झाला. अशा प्रकारचे कार्य सर्वच मानवी समूह करीत होते. प्रारंभी मनुष्य स्वभाव शांत, सहकार्यप्रीय होता. प्राथीक अवस्थेत समुह, टोळया एकसंघ पध्दतीने राहत असत. या अवस्थेत कोणात्याही प्रकारचा शोध लागलेला नव्हता. अर्थात ही अवस्था शांतीमय व आनंदमय होती. कोणत्याही प्रकारची समस्या आस्तीत्वात नव्हती. कारण लोकसंख्याच अत्यल्प होती. काळ परिस्थितीनुसार लोकसंख्या वाढ झाली. विज्ञानाची प्रगती झाली तेव्हा मनुष्य प्राणी हा स्वार्थी बनला आणि इतरावर हक्क अधिकार गाजवण्यास तयार झाली. त्यामुळे एकमेकावर संपतीपोटी डावपेच करुन धष्टपुष्ट कमकूवत समूह किंवा नागरीक, देशावर आपले नियंत्रण ठेऊ लागली की ,सर्व काही माझेच आहे ? सर्वत्र माझेच वर्चस्व ? माझी हूकूमत? माझी सत्ता सर्वत्र असावी असा विचार पुढे येऊ लागला त्यातुनच परस्पर सहकार्याची जागा संघर्ष, युध्दाने घेतली. युध्दासाठी लागणारी साधने निर्माण करण्यात स्वार्थी मनुष्य जनहितापेक्षा स्वहितासाठी वाटेल त्या गैरमार्गाचा अवलंब करु लागला. नवनवीन शोध लावत राहिला त्यात त्याला यश मिळत गेले. परिणामी, अनुबॉम्ब तयार करणे, शेतीतील पाले भाज्या फळावर बसणारे किटकनाशकांचा खात्मा करणारी विषारी औषधे निर्माण झाली. त्यामूळे मानवाला पालेभाज्यातून गंभीर आजाराला आमंत्रण मिळाले. पाणबुडया, विमाने, बंदुकीचा शोध लागला, उर्जा निर्माण करणारी यंत्रे, तेल, साखर, दार,गुळ , रासायनिक खते निर्माण करणारे केमीकलचे कारखाने तयार झाले. यातुन बाहेर पडणारी प्रचंड उष्णता, धुप, धुर हावेत सोडला जाऊ लागला. औघौगिकरण, शहरीकरणाच्या वाढीमूळे शेतीचे नुकसान, जंगलांची नासधुश करुन त्या ठिकानी उभारण्यात येणारे मोटमोटे उर्जाप्रकल्प, अनुभट्टया यामूळे पजन्य नष्ट होऊ लागली. परीणामी वनस्पती व हजारो प्राण्याच्या, पक्षांच्या प्रजाती नष्ट होऊ लागल्या. जमिनीच्या प्रयोगाबरोबरच समुद्रातही नवनवीन प्रयोग करु लागल्यामुळे तेलगळतीचे प्रमाण वाढून समुद्रातील अनेक जिवजंतू नष्ट होऊन समुद्राच्या पाण्याचा रंग बदलू लागला. शहरी भागातील अशुध्द असणारे सांडपाणी नदी व समुद्रात सोडत असल्यामूळे पाण्याच्या प्रदूषणात वाढ होउ लागली.अर्थात समुद्र प्रदूशित होऊ लागले. शेतीच्या मातीची कस कमी होऊन तिची धुप वाढू लागली. त्यामूळे उन्हाळा, पावसाळा आणि हिवाळा या श्रतुमध्ये बदल झाला आहे. तळी, विहीरी, सरोवरे पाण्याविना रिकामी दिसू लागली. याचा परीणाम वृक्ष, वेली पाणाविना नष्ट होऊ लागली. कारखानदारीच्या धुराच्या वायुतील प्रदूषनामूळे त्या भागातील जनतेला आनेक रोगांचा सामना करावा लागातो. या समस्या वातावरणातील ओझोनचा थर विरळ होणे. या सर्वाचे परिणाम हवामानात होणारे बदल हे प्रादेशिक व जागतीक पातळीवर पर्यावरणीय समस्या निर्माण करणारे आहेत, याचे महत्वाचे कारण वाढते औद्योगिकीकरण, लोकसंख्यावाढ, विज्ञानाची होत असणारी प्रचंड प्रगती, यामुळे प्रगत राष्ट्रांचा फायदा झाला परंतू विकसनशिल राष्ट्रांना अनेक समस्यांचा सामनाच करावा लागतो. ही स्थिती प्रगती राष्ट्रात दिसत नाही कारण प्रगत राष्टे प्रथमच कोणत्याही प्रकारच्या समस्या निर्माण होणार नाहीत याचा अभ्यास करुन त्यावर उपाय केलेले असतात. म्हणुन प्रगत देशापेक्षा अप्रगत देशातील लोकसंख्येचया मूत्यृदर ही अधिक दिसुन येतो. या समस्या विकसीत राष्ट्रांच्या राजकीय डावपेचामूळे निर्माण झालेल्या दिसतात. समस्या निर्माण करतात प्रगत देश? भोगावे लागते अप्रगत देशांना ही सध्याची स्थिती आहे.



१९६० च्या दशकापासून जगात पर्यावरणीय समस्ये संदर्भात मोठया प्रमाणात जनीव जागृती होऊ लागली. सागर, नदयातील मासे मारण्याचे प्रमाण वाढू लागले. वसाहतवाद औद्योगिकरणामूळे प्रगत राष्ट्रे तिसऱ्या जगातील राष्ट्रांच्या पर्यावरणीय व्यवस्थेची जंगल तोडी मूळे पर्यावरणाची समस्या सुरु झाली. याचा परिणाम २० व्या शतकात जागतिक स्तरावर दिसू लागले. यावर काही ठोस उपाय करण्यासाठी विकसीत राष्ट्रांनी पुढाकार घेऊन युरोपातील नदयांचा उपयोग, आंतरराष्ट्रीय सागरी संघटना यासारख्या संस्था निर्माण करुन नदयांमधील व्यापार, जहाजांची सुरक्षितता या समस्यांवर कार्य करु लागले. १९११ मध्ये रशिया, अमेरीका आणि कॅनडासारख्या राष्ट्रांनी फरशिल प्राण्यांच्या रक्षणासाठी करार केला. १९४५ साली नैसर्गिक साधनसंपतीसाठी संयुक्त राष्ट्रांची "अन्न व शेतीसंघटना" स्थापण केली. तिचे कार्य व अधिकार (FOA) अंतर्गत करण्यात आले. देव माशांची मोठया प्रमाणात होणाऱ्या शिकारीवर बंदी घालणारी परिषद १९४६ मध्ये घेण्यात आली. १९६० च्या दशकात किटकनाशकाच्या अतीरेकी औषधी वापरामूळे होणाऱ्या नुकसानीबाबत जानीव जागृती आनेक राष्ट्रां होत होती .त्यामूळे पर्यावरण समस्याबाबत आनेक चळवळी सुरु झाल्या. मानवी शरीरावर व जीवसृष्टीवर किरणोत्सर्गाच्या होत असणाऱ्या परीणामाची जाणीव झाल्यावर विकसीत राष्ट्रांनी आणिक चाचण्या घेण्यास बंदी घालणारा करार करण्याकाठी तिसऱ्या जगातील राष्ट्रांना भाग पाडले. १९६७ मध्ये सागरातुन टोरी कॅन्थन या तेलवाहू जहाजातून झालेल्या तेलगळतीमूळे समुद्राच्या संरक्षणासाठी कामाला लागली. त्यासाठी सामायीक साधनसंपतीचे कायदे तयार केले. १९७२ साली पर्यावरणाविषयी स्विडन मधील स्टॉकहोम येथे परिषद भरवीण्यात आली . या परिषदेत प्रदुषण आणि पर्यावरणाविष्यक समस्या सोडविण्यासाठी एक सुसुत्र चौकट निर्माण केली. त्यामूळे आंतरराष्ट्रीय पर्यावरणाच्या राजकारणाला वळण आले. पर्यावरणाविषयक मुद्दे हे आंतरराष्ट्रीय परिषदे अंतर्गत मार्यादित न राहता जागतिक सामायीक साधनसंपती, सिमापार होत असणाऱ्या प्रदुर्शनावर उपाय करण्याची जबाबदारी सर्व राष्ट्राची असेल हे तत्वही मान्य करण्यात आले. विकसीत राष्ट्रांच्या प्रमुखांनी स्टॉक होम परीषदेत असे मत व्यक्त केले की, पर्यावरण ऱ्हासाची जबाबदारी औद्योगिक विकासाच्या दृष्टीकोणातून झाल्यास ती समस्या सोडविण्याची जबाबदारी विकसीत राष्ट्राचींच असली पाहिजे. अशी मागणी तिसऱ्या जगातील राष्ट्रांची होती .ती प्रगत देशांनी मान्य केली. त्यामुळे स्टॉकहोम परिषद ऐतिहासीक ठरली १९८० च्या दशकांतआंतरराष्ट्रीय स्तरावर आनेक करार व कार्यक्रमही करण्यात आले. परीणामी बहुतांशी राष्ट्रांनी पर्यावरणविषय समस्या सोडविण्यासाठी स्वतंत्र खात्याचे विभाग निर्माण केले. ज्या खाण्यातर्गत राहून पर्यावरणविषय समस्या देशांतर्गत पातळीवर सोडविण्यास मदत होईल. स्वतंत्र खात्याची निर्मिती केल्यामुळे पर्यावरण हा विषय चर्चीला जाऊ लागला. संयुक्त राष्ट्रसंघासारख्या महत्वपूर्ण जागतिक संघटनेनी सुध्दा "संयुक्त राष्ट्र पर्यावरण कार्यक्रम" घेण्यावर भर दिला. १९९० नंतर पर्यावरण विषयी जागतिक स्तराव आनेक करार करण्यातही आले. तसेच आंतरराष्ट्रीय स्तरावर नियम, संस्था, पर्यावरण शास्तज्ञ व तज्ञ यांचे एक संघटनच निर्माण झाले. विकसीत राष्ट्रात ग्रीन पक्ष स्थापण करण्यात आले. प्रगत देशांबरोबर अप्रगत राष्ट्रांनी देखील पर्यावरण विषयी चळवळी मोठया प्रमाणात सुरु केल्या. त्या पर्यावरण विषयी समस्याचे निराकरण करण्याचे कामही करीत आहेत. स्टॉक होम परिषदेचा जो पर्यावरण विषयक समस्ये संदर्भात हेतू होता तो राबविण्यात यश आले नाही. त्यामुळे तिसऱ्या जगातील राष्ट्रांची पर्यावरण विषयी समस्येबाबत चींता वाढली .पुढे संयुक्त राष्ट्रसंघानी विकास व पर्यावरण यावर एक जागतिक आयोग बुंटलॅड यांच्या अध्यक्षतेखाली नेमला. या अहवालात "टिकाऊ विकास" ही संकल्पनाच संदिग्ध वाटू लागल्यामूळे रिओ दी जानिरो या ठिकाणी "पर्यावरण आणि विकास" यावर परीषद भरवली. यात प्रामुख्याने ग्रीन हाऊस वायू, वातावरणातील बदल, जैविक विविधता, जंगलांचे संरक्षण आणि वाळवंटांचे रक्षण करणे हे करार करण्यात आले. याखेरीज "टिकाऊ विकास" ही संकल्पना साध्य करण्यासाठी जंगलतोड थांबविणे, वृक्षांच्या लागवडी करणे, जिवतंत्रज्ञानाचे व्यवस्थापण करणे, धोकादायक कचऱ्याचे, सांडपाण्याचे व्यवस्थापण करणे, या सर्व प्रश्नांचा कार्यक्रम पत्रीकेत समावेश केला. या प्रश्नांनवर ठोस उपाय करण्यासाठी त्याला लागणाऱ्या

आधिक खर्चाचा तपशिलवार आराखडा तयार करण्यात आला "टिकाऊ विकास" याकरीता एका आयोगाची स्थापण करण्यात आली. पर्यावरणीय समस्यांची साडेवणुक करण्यासाठी निर्णय घेण्यात आले असले तरी प्रत्यक्षात त्याची अमलबजावणी करण्यात यश आलेले दिसत नाही.

जागतिक पातळीवर सामायीक साधनसंपतीचे नियमण करणे व पर्यावरणीय संपत्तीचे रक्षण करणे तसे अवघड असते. कारण संपतीवर दावा करण्याऱ्यांची संख्या अधिक असते. संपतीवर दावा करणारेच संपतीच्या जुळवाजुळवीत पर्यावरनाचा ऱ्हास करतात. यासाठी पर्यावरनवादी लोक मुक्त व्यापाराच्या संकल्पनेला विरोध करतात. त्यांच्या मते, मुक्त व्यापारामुळे नौकरशाहीला जास्तीचे अधिकार मिळतात. अशा नोकरशहांना पर्यावरण रक्षणापेक्षा संपती गोळा करण्यावर अधिक लक्ष देतात. त्यामुळे खरी समस्या आहे ती औद्योगिकरणाच्या संस्कृतीची. यामुळे साऱ्या पृथ्वीचेच पर्यावरण समतोल नष्ट होण्याची अधिक भिती वाटत आहे. औद्यौगिकरणाच्या नावाखाली अती हाव करुन निसर्गनियमांच्या विरोधात जाऊन, निसर्गाचे शोषण करुन आखील मानव जातीचे हित धोक्यात आणणाऱ्या व्यवस्थेलाच पर्यावरणवादी विरोध करतात. पर्यावरण प्रशनाबाबतीत महत्वाची समस्या म्हणजे ज्या संपतीला जागतिक सामाजिक साधनसंपती म्हणतात. तिच्या वाटपाविषयी राष्ट्रां-राष्ट्रांमध्ये स्पर्धा, सौदेबाजी व संघर्ष होतात. अशा प्रकारचे संघर्ष होणार नाहीत व्याकरीता एकमेकांना सहकार्य करणे. त्यासाठी करार करणे. त्यातून योग्य मार्ग काढणे अतिशय महत्वाचे असते.

सामायीक साधनसंपतीबरोबर प्रदूषन किंवा पर्यावरणाचा होत असणारा ऱ्हास यास आळा घालण्यासाठी जागतिक राष्ट्रांनी सर्वसंमत असे नियम तयार करुन प्रत्येक देश आपआपल्या राष्ट्रात राबवायचे असतात. जर अशा प्रकारचे नियम प्रतेक राष्ट्रांनी राबविले तर पर्यावरण प्रदूषणाचा ऱ्हास होणार नाही. उलट पर्यावरण रक्षणाची काळजी घेणाऱ्या राष्ट्रांच्या संख्येत वाढ होईल. पर्यावरणाची हानी होणार नाही. म्हणूनच विशिष्ट रसायने किटकनाशकासाठी वापरणारे औषधे जंगलतोड करणे, प्रदूषके पाण्यात सोडणे, यावर बंदी घालणे महत्वाचे आहे. अन्यथा वातावरणात बदल होऊन जागतीक तापमानात वाढ होईल. अशा प्रकारची निसर्ग नियमाविरुध्द मानवानी कोणतेही पाऊल उचलू नये. कारण आंतरराष्ट्रीय क्षेत्रातील विपर्यावरणाविषयक प्रश्न अनेक प्रकारची असतात. उदाः वातावरणातील होणारा बदल, ओझेनचा थर विरळने, विविध प्रकारची जैविकता नष्ट होणे, प्रदूषणात वाढ होणे, नैसर्गिक साधन संपती धोक्यात येणे इ. प्रकारच्या समस्या राष्ट्रीय किंवा जागतिक पातळीवर संपूर्ण मानवी समुहाला भेडसावनाऱ्या दिसतात. त्याचा तपशिलवार विचार खालील प्रमाणे.



## तापमान वाढीमूळे वातावरणात होणारा बदल -

तापमान वाढीमूळे वातावरणात बदल होतो. त्याचे कारण असे की, ऑर्क्टिक व अंटाक्टिकावरील बर्फ वितळून जागतीक महासागराच्या पाण्याच्या पातळीत वाढ होईल. ज्यामूळे विविध खंडाच्या किनाऱ्यावरील शहरांना पुरांचा धोका निर्माण होईल. अनेक भागातील वातावरणात बदल होईल काहींना फायदा तर काहींना समस्यांचा सामना करावा लागेल. किंवा मनुष्य हानी ,शेतीचे मोठया प्रमाणात नुकसान होईल. असे घडण्याचे कारण असे की, औद्यौगिकरणात झालेल्या प्रचंड प्रगतीमूळे कॉर्बन डायॉक्साईड व इतर प्रदूषण वाढवणारे वायू जास्त प्रमाणात वातावरणात सोडले जातात तेच तापमानवाढीला कारणीभूत असतात. तेल, कोळसा,व नैसर्गिक वायूचा इंधनासाठी वापर केल्यामूळे वायूची निर्मिती होत असते. हेच वायू वातावरणात साठतात आणि सुर्य किरणामुळे निर्माण झालेली उष्णता वातावरणा बाहेर फेकली जाऊ न देता आडवली जाते. त्यामूळे तापमानवाढ होते. त्यास "ग्रिनहाऊस गॅसेस" असेही म्हणतात.



तापमानवाढी बरोबर ओझीनचा थराही विरळ होत असते त्याचे कारण असे की, औद्योगिकरणामूळे काही विशिष्ट रसायणे वातावरणात सोडली जातात. अशा प्रकारची रसायणे तरंगत वातावरणाच्या सार्वात वर पोहचतात तिथे ही रसायणे ओझोन वायुवर परिणाम करतात. तो वायू जसा जसा कमी होत जातो तस तसा ओझोनचा थर विरळत जातो. ओझोनचा थर हा खऱ्या अर्थाने सुर्यांच्या अतिनील किरनांना पृथ्वीवर येण्यास अटकाव करीत असतो. जर ओझीनचा थरच नष्ट होत गेला तर सुर्या प्रखरतेने किंवा अतिनिल किरणांच्या उत्सर्गामूळे मानवाला त्वचेच्या कर्करोगाला तोंड दयावे लागते. याचा प्राणी, वनस्पती व शेतीवरही परिणाम होऊ शकतो परिणामी पर्यावरणीय व्यवस्थेचाही नाश होऊ शकतो. अशा प्रकारची भीती विचारवंत, पर्यावरण विषयक अभ्यासक, शास्त्रज्ञ व्यक्त करतात.

ओझोनच्या थराबरोबरच जैविक विविधता अतिशय महत्वाची असते. पृथ्वीतलावरील पर्यावरणीय व्यवस्था तयार होतात अशा प्रकारच्या लाखो प्रजाती तयार होऊन सर्वदूरपर्यंत पसरलेल्या असतात. त्या विशिष्ट ठिकाणीच आढळतात हया प्रजाती मानसांनी केलेल्या पर्यावरणीय व्यवस्थांच्या ऱ्हासामूळे काही नष्ट पावल्या आहेत .तर काही नष्ट होण्याच्या मार्गावर आहेत. हया प्रजाती एकदा नष्ट झाल्या की त्या पुन्हा निर्माण होणे कठीन आसते. वनस्पती व प्राणी नष्ट होण्यास आनेक कारणेही असतात उदा. फर्निचर तयार करणे, घरे बांधणे , शेतीची औजारे तयार करणे, रेल्वे रुळ तयार करण आणि शहरीकरणाच्या वाढीसाठी वृक्ष व जंगल तोड करणे तसेच पक्षी व प्राण्याची शिकारी करणे, उदा. मोर, हरीन, ससा, मगर, घोरपड, तीतर , कोकीळा, मैना इ. बरोबर मासेमारी करणे, पर्जन्यवनांची तोड करणे, शेतीचा शहरीकरणासाठी व बांधकामासाठी वापर करणे, तलाव विहिरी सरोवरे प्रदूर्षीत करणे, इत्यादी मूळे जमिनी वाळंवटासारख्या दिसु लागतात. अशा प्रदेषात ना वनस्पती ना प्राणाच्या जाती दिसतात. यासाठी एकच पर्याय म्हणजे जंगल तोड थांबवीने हे सर्व मानव जातिच्या हिताचे आहे ही जबाबदारी पृथ्वीतलावरील सर्व मानव जातीचे असली पाहिजे यासंदर्भात जागतीक पातळीवर सर्वांनी एक दिलाने एक संघ पध्दतीने पर्यावरण विषयक समस्यावर सकारात्मक विचार करुन त्याचे कृतीत रुपांतर केल्यासच ही समस्या सुटू शकते. जंगले आणि महासागराचे संरक्षण केल्यामूळे जागतीक तापमानवाढ कमी होण्यास मदत होते. घनदाट पर्जन्यवने वाढवने, वातावरणातील कार्बन डायॉक्साईड कमी करुन प्रदूषण कमी केल्यास पर्यावरणीय समस्या उदभवनार नाहीत. त्यासाठी प्रगत राष्ट्रांनी स्वतःच्या प्रदेशातील जंगले व पर्जन्यवणाचे रक्षण करणे त्याचबरोबर तिसऱ्या जगातील अप्रगत राष्ट्रांना जंगले, सरोबरे, नदया, पर्यावरणाचे संरक्षण करण्यासाठी अर्थिक सहकार्य केले पाहिजे तरच जागतिक तापमान वाढ कमी होऊ शकतो.

जैविक विविधता टिकण्यासाठी प्रदूषण होणाऱ्या घटकावर निर्बंध घातले पाहिजे. प्रदूषण ही संकल्पना अनेक घटकामूळे होवू शकते त्याला एकच कारण नसते. औद्यौगिकरण, शहरिकरण हा महत्वाचा पैलू असला तरी सातत्यांने उद्योगाच्या नावाखाली होणारे विषारी रासायनीक द्रव्य, विषारी आणि आण्विक कचऱ्याचे प्रदूषण ही एक गंभीर समस्या आहे. त्याचे महत्वाचे कारण असे की , अशा प्रकारच्या प्रदूषणाचे परिणाम दिर्घकालीन व धोकादायक असतात. आनेक राष्ट्र असे आहेत की आपल्या देशातील घातक असणारा कचरा जहाजातून समुद्रात टाकण्याचा प्रयत्न करतात. तसेच प्रगत राष्ट्रे अप्रत राष्ट्रात अशा प्रकारचा कचरा पाठवीतात. अप्रगत देश अण्विक कचऱ्याची विलेवाट लावण्यासाठी प्रगत राष्ट्रकडून पैसा घेतात. या सर्व गोष्टी वर आंतरराष्ट्रीय पातळीवर करार करुन बंधने घातले पाहिजेत. तसेच प्रतेक राष्ट्रांनी आपल्या आण्विक कचऱ्याची विलेवाढ आपल्याच राष्ट्रात केली पाहिजे ओला किंवा सुका कचरा व वाळला कचरा अलग करुन टाकावू पासुन टिकावू उपयोगास येणाऱ्या हानी न पोहचनाऱ्या वस्तू निर्माण करण्यावर लक्ष दिल्यास प्रदूषण रोखण्यास मदत होईल.

प्रदुर्षण रोखण्याबरोबरच नैसर्गिक साधन संपती पर्यावरण मानवी विकासाकरीता अतिशय महत्वाची असते त्याशिवाय जिवानू जगू शकत नाहीत म्हणून नैसर्गिक साधन संपतीचे रक्षण करणे महत्वाचे असते. नैसर्गिक साधनसंपतीवर देशाचा विकास अवलंबून असतो उदा. महासागरातील खनिज साधन सामुग्री संदर्भात आंतरराष्ट्रीय पातळीवर संघर्ष झालेले आहेत. परंतु देशांतर्गत नैसर्गिक खानिज संपती ही जागतिक सामायीकतेचा

भाग नसते. ही संपती जागात सर्वत्र सारख्या प्रमाणात उपलब्ध नसल्यामुळे तिच्यावर आपलेच वर्चस्व असले पाजि यासाठी देशा-देशामध्ये संघर्ष परिणामी युध्दही होतात उदा. कच्या तेलाचे साठे अरब राष्ट्रात आहेत त्याच्यवर वर्चस्व ठेवण्यासाठी प्रगत राष्ट्रे विशेषत अमेरीका संघर्ष करीत असते. नैसर्गिक साधन संपतीमध्ये तेलाबरोबर, कोळसा, रबर, उर्जा साधने औद्योगिक विकासाकरीता महत्वाची असतात. त्याचबरोबर वायू आणि जलविद्यूतही महत्वाची उर्जा देणारी संपती असते. अशा प्रकारची खनीज संपती आयात करण्यासाठी विकसीत राष्ट्रे युध्दही करतात. उर्जा साधनासाठी तेलाचे सर्वाधिक महत्व आहे. ज्या राष्ट्रात तेलाचे साठे आहेत त्या राष्ट्रांसोबत मैत्री करार करतात त्यातून त्यांच्यावर वर्चस्व ठेवतात. कच्चे तेल स्वस्त दरात आयातही करतात. सौदी अरेबीया सर्वाधिक तेल निर्यात करणारा देश आहे. १९९० साली इराकने कूवतेवर हल्ला केल्यावर अमेरिकेला असे वाटले की , आपल्या तेलाच्या आयातीवर बंधने यतील व तेल साठयाचा तुटवडा निर्माण होईल या भितीमूळे संयुक्त राष्ट्र संघाच्या सहमतीने इराकवर हल्ला केला . पुन्हा २००२ साली पुन्हा इराकवर हल्ला केला की इराकच्या तेलावर इराकचे नव्हे तर अमेरीकेचे नियंत्रण असावे. इराक अमेरीकेच्या विचाराने काम करावा तेलाचा पुरवढा स्वस्त दारात अमेरीकेला मिळावा हा त्यामागचा हेतू होता. शेवटी अमेरीकेचे राष्ट्राध्यक्ष जॉर्ज डब्लू बुझा दुसरे यांनी इराकचा सर्वेसर्वा असणारा सदाम हुशेन यास फासावर लटकवून आंतरराष्ट्रीय राजकारणात अमेरीकेचे वर्चस्व किंवा महत्व अधोरेखीत केले आहे .आजही तेल हे उर्जा निर्मितीचे महत्वाचे साधन आहे परंतु पृथ्वीतलावरील सर्वच राष्ट्रे एकमेकांच्या सहकार्याने खनिज साधन सामुग्री आयात किंवा निर्यात करुन अर्थिक विकासाचा दर वाढविण्यावर भर दिल्यास युध्दासारखे , पर्यावरण प्रदूषणासारखे किंवा जागतीक तापमान वाढीसारखे प्रश्न निर्माण होणार नाहीत.

तेलासारखेच पाणीसुध्दा नैसर्गिक साधन संपतीमधील महत्वाचा घटक आहे. ज्याशिवाय मनुष्य, प्राणी किंवा वनस्पती अस्तीत्वात राहू शकत नाहीत. राष्ट्राचा विकास जसा वाढत असतो तेवढयाच प्रमाणात पाण्याची आवश्यकता असते पाणी हे पिण्यासाठी, शेतीसाठी, आणि उद्योगासाठी आत्यावश्यक साधन बनले आहे. पाण्याच्या वापराचे प्रमाण वाढले आहे. पिण्याच्या पाण्याचा व वापराच्या पाणाचाही पुरवठा मर्यादित होत असल्यामूळे पाण्यावरुन होणारे संघर्ष जगभरात वाढत आहेत. नदयांच्या पाण्याचा वाटपावरुन होणारा वाद, कालवे, धरणे यांच्या पाण्याचे वाटप दोन देशांनमधील वादाचे मुदे बनले आहेत. उदा. भारत - पाकिस्तान, भारत- बांगलादेश , जॉर्डन, सिरीया, लेबनान, तैग्रीस युफेटीस, तुर्कस्तान, इराक इत्यादी देशामंध्ये संघर्ष पाण्यावरुन झालेले दिसतात.



## सारांश

पर्यावरण प्रदुषण ही एक जागतीक समस्या असतील तरी ती सोडविण्यासाठी प्रतेक राष्ट्र स्थानिक पातळीवर प्रयत्न करणे गरजेचे आहे त्यासाठी देशपातळीवर शासनव्यवस्थेने पर्यावरणासंदर्भात जाणीव जागृती शाळा, महाविद्यालयातून, संस्था, संघटना आणि प्रशासन व्यवस्थेकडून सातत्याने कायदेशिरपणे कली पाहिजे. पर्यावरणाचे महत्व लहान बालकांपासून वृधापर्यत पटवून सांगीतले पाहीजे. देशातील प्रत्येकांने किमान एका वृक्षाची लागवड करुन तो वृक्ष वाढेपर्यत त्याची स्वतःसारखी काळजी घेतली पाहिजे. वातावरण शुध्द करणारी वृक्ष लावले पाहिजेत. ही जाबाबदारी शासनाने कायदयानेच प्रत्येक नागरीकास दिल पाहिजे घान व अण्विक कचऱ्याची योग्य विलेवाट लावली पाहिजे. ओला व सुका कचरा अलग करुन त्याचा शेतीविकासाकरीता खत निर्माण केला पाहिजे. टाकावू कचऱ्यापासून टिकावू वस्तु निर्माण केले पाहिजे. ज्या गोष्टी पर्यावरणाला घातक आहेत त्याकडे अधिक लक्ष केंद्रित केले पाहिजे की वातावरणात बदल होऊन दुष्काळ पडेल पर्यावरण प्रदूर्षन वाढेल अशा प्रकारची कोणतेही पाऊले

न उचलता जगातील प्रतेक मानव जातीने आम्ही सर्व एक आहोत असा नारा जागतीक स्तरावर देऊन नैसर्गिक खनीजसंपतीसाठी, संघर्ष किंवा युध्द न करता.जागतीक स्तरावर पर्यावरण विषयक निर्माण झालेले प्रश्न परस्पर सहकार्याने आपण सोडवू शकतो अशी शपत प्रत्येक राष्ट्रांनी घेवून एक पाऊल पुढे टाकल्यास पर्यावरणविषयी उदभवलेला प्रश्न सोडविण्यास वेळ लागणार नाही. त्यासाठी प्रगत राष्ट्रे प्रथम तिसऱ्या जगातील राष्ट्रांना विश्वासात घेऊन कोणात्याही प्रकारचे राजकीय डावपेच न करता महत्वाचे पाऊल उचलल्यास सर्वासाठीच अधिक लाभदायक ठरेल . तेव्हा पृथ्वीतलावर आंनददायी वातावरणाचे थंडगार वारे वाहण्यास वेळ लागणार नाही.

## संदर्भ सूची


१. Doron zimmerman, Intarnational Relation, Form could war to the Globalized world, Viva book Publications ,New Delhi-२००४.
२. Jagdis Bhagwati, In Defense of Globolization , Oup, Publication, New Delhi-२००४.
३. Rajesh Basrur, Security In the New Millennium Views form south Asia, India Research Press, New Delhi २००१.
४. Rajan Harshe & K.M seethi, Engaging with the world eritical Refleetions on indiais foreign policy, Orinet Logman Ltd. Hadrabad, २००५.
५. शशि शुक्ला, आंतरराष्ट्रीय राजनीति, भारत बुक सेंटर लखनऊ २००७.
६. डॉ. रुमकी बसू, संयुक्त राष्ट्रसंघ , सिध्दांत एवं व्यवहार, जवाहर पब्लिशर्स एंड डिस्ट्रीब्यूटर्स नई दिल्ली २०११.
७. बी.सी.नरुला, प्रमुख राष्ट्रो की विदेशीनीति, अर्जून पाब्लिशिंग हाऊस, नई दिल्ली, २०१२
८. अरुणा पेंडसे/ उत्तरा सहस्त्रबुध्दे, आंतरराष्ट्रीय संबंध शीतयुध्दोत्तर व जागतिकीकरणाचे राजकारण, ओरिएंट लॉगमन प्रायव्हेट लिमिटेड, मुंबई, २००८.